।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

## परिपत्रक क्रमांक ३५४/२०१८

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, दि.०६ ऑगस्ट, २०१८

महाराष्ट्र शासनाच्या वरील संदर्भीय राजपत्राच्या अनुषंगाने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा **'कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव'** असा नामविस्तार दि. ११ ऑगस्ट, २०१८ पासून प्रचलीत करण्यात आलेला असून, या विद्यापीठाचा नामविस्तार सोहळा दि.०८.१०.२०१८ रोजी महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेला आहे. शासनाने या विद्यापीठाचा नामविस्तार करुन समस्त खान्देशवासियांच्या भानविक, सामाजिक व सांस्कृतिक जाणीवांची दखल घेऊन ह्या महान कवयित्रीचे नाव विद्यापीठाला दिले जाणे ही साहित्यिक न्यायासह प्रांतिक अस्मितेचा गौरव करणारी बाब आहेच, शिवाय सर्वसामान्यांशी ह्या विद्यापीठाचे नाव घट्ट करणारी अनोखी घटना आहे.

तेव्हा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांनी यापुढे दरवर्षी बहिणाबाई चौधरी यांची जयंती आणि पुण्यतिथी साजरी करावी व त्यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे असा मानस मा.कुलगुरू महोदयांनी व्यक्त केला आहे.

वरील बाब विचारात घेऊन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक यांना प्राप्त आदेशान्वये या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, आपण आपल्या महाविद्यालयामध्ये/परिसंस्थांमध्ये दरवर्षी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या जयंती आणि पुण्यतिथी निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन दरवर्षी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची जयंती व पुण्यतिथी साजरी करावी व याबाबतचा अहवाल आवश्यक त्या छायाचित्रणासह निम्न स्वाक्षरीकर्ता अधिकारी यांच्याकडे सादर करावा, ही विनंती.

जा.क्र.कबचौउमवि/०२/२६८/२०१८
दि. २१.१२.२०१८

(प्रा. अं. बा. चौधरी)
**प्र.कुलसचिव**

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.

**प्रत माहितीसाठी.**

१. प्र.उपकुलसचिव, मा.कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.
२. उपकुलसचिव, मा.प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.
३. उपकुलसचिव, प्रशासन विभाग, कबचौउमवि., जळगाव.

उमविनगर, जळगाव – ४२५००१ (महाराष्ट्र) भारत , दुरध्वनी क्र.: ०२५७–२२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७–२२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257- 2258428, 2258429
Fax No. 0257-2258403, 406. E-mail : registrar@nmu.ac.in Web: www.nmu.ac.in